**सामान्य प्रशासन विभाग क्र.1**

**जिल्हा परिषद, सोलापूर**

**जा.क्र.जिपसो/साप्रवि-१/कार्या-१४/७०७२०२० सोलापूर दि.२४/०९/२०२०**

# निविदा सुचना

जिल्हा परिषद सोलापूर येथील मध्यवर्ती इंटरनेट सुविधा सुरळितपणे चालू रहाणेकामी व नेटवर्कींग/लॅन कनेक्शन संदर्भात अवेळी उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणीचे विहित मुदतीत निराकरण होणेकामी तसेच नेटवर्कींग अनुषंगिक उपकरणांची वेळोवळी देखभाल दुरुस्ती होण्यासाठी जिल्हा परिषद मुख्यालयात कार्यरत असलेल्या नेटवर्कींग / लॅन कनेक्शचा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (Non Compressive) करावयाचा असल्याने मोहोरबंद लिफाफामध्ये दरपत्रक मागविणेत येत आहे. इच्छुक पुरवठाधारकांनी प्रशासकीय बाबी संदर्भातील नियमित व प्रचलित नियम व अटी लक्षात घेऊनच तपशीलामध्ये नमुद केलेप्रमाणे साहित्याचे दर सादर करावेत. इतर सर्व समावेक्षक कर सेवा कर/मुल्यवर्धीत कर यांचा तपशीलवार उल्लेख करुनच दरपत्रके विहित मुदतीत सादर करावीत.

**खालीलप्रमाणे नेटवर्कींग देखभाल दुरुस्ती (Non Compressive) वार्षिक कराराकरिता दरपत्रके मागविणेत येत आहे.**

| अनं | तपशील | दर | आवश्यकता | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | जि.प मुख्यालय अंतर्गत कार्यरत व कार्यान्वित करावयाचा इंटरनेट/लॅन कनेक्शचा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार | वार्षिक देखभाल दुरुस्ती करार | पुढील एक वर्षाकरिता | |

सदर दरपत्रके हे दि. 06/ १०/२०२० रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने बंद लिफाफ्यातुन पाठवावे व लिफाफ्यावर **नेटवर्कींग वार्षिक देखभाल दुरुस्ती करार दरपत्रके** असा स्पष्ट अक्षरात उल्लेख करावा.

**(परमेश्वर राऊत)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

प्रत - १) कार्यालयीन नोटीस बोर्डावर.

२) ई-मेल आय.टी सेल -जिल्हा परिषद सोलापूर या सांकेतिक स्थळावर प्रसिध्दीसाठी

# नेटवर्कींग व लॅन देखभाल दुरुस्ती कराराबाबत निविदेच्या नियम व अटी

१) पुरवठाधारकांचे/मक्तेदारांचे वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST) रजीस्ट्रेशन सट्रीफिकेट असणे आवश्यक.

२) निविदाधारकाने स्वतःच्या अटी (तांत्रिक बाब व आर्थिक बाब असलेली कोणतीही अट) घालून सादर केलेली निविदा मान्य करण्यात येणार नाही.

३) मक्तेदारांने जिल्हा परिषदमधील कार्यरत असलेले एकूण ३१५ + अधिक संगणकासाठी नेटवर्कींग व लॅन कनेक्शचे वेळोवेळी काम करणे क्रमप्राप्त राहील (यामध्ये POE स्वीच, Server Unit etc.) तसेच दरकराराच्या अवधीमध्ये जोडण्यात आलेले नवीन तद्अनुषंगिक यंत्रणा हे सुद्धा वार्षिक देखभाल दुरुस्ती करारामध्ये समावेश असल्याने अथवा या अटीवर करणेबंधनकारक राहील. याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

४) मक्तेदारांस नेटवर्कींग दुरुस्तीकरिता कळविले असता त्यांनी २४ तासांच्या आत येवून यंत्रणेची पाहणी करणे बंधनकारक राहील. म्हणजेच २४ तासांच्या आत सदरची यंत्रणा दुरुस्त करणे संबंधित मक्तेदारास बंधनकारक राहील. अन्यथा लागणाऱ्या विलंबास र.रु ५००/ प्रती दिन प्रमाणे दंड आकारला जाईल. सदरचा दंड अंतिम देयक अदा करताना कपात केला जाईल.

५) तसेच यंत्रणादुरुस्तीबाबत आवश्यक साहित्याचा/साधनांचा तपशील सामान्य प्रशासन विभाग क्रं.१ या कार्यालयास कळविणे बंधनकारक राहील व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) यांचे सुचनेनुसार आवश्यक साहित्याचा पुरवठा करावयाचा आहे.

६) जर एखादे लॅन /नेटवर्कींग संबंधित साहित्य/ सामुग्री या कार्यालयाने खरेदी केली असता ती कार्यान्वित करणेची संपूर्ण जबाबदारी ही मक्तेदारांचीच राहील. त्यासाठी त्यांना कोणतेही अतिरिक्त सेवाशुल्क दिले जाणार नाही.

७) जि.प अंतर्गत लॅन/नेटवर्कींगच्या देखभाल करिता दरवेळी पत्रव्यवहार करणे शक्य नसलेमुळे मक्तेदांस त्यांचेकडील भ्रमणध्वनी क्रमांक कळविणे बंधनकारक राहील व नेटवर्कींग/लॅन कनेक्शनच्या कार्यप्रणाली संबंधित बिघाड /नादुरुस्तीबाबत मक्तेदारांस मोबाईल/टेलिफोन द्वारेच कळविले जाईल. याची नोंद घ्यावी.

८) एखादे वेळी जर मक्तेदारांने विहित वेळेमध्ये काम केले नाही तर तेच काम इतर मक्तेदारांकडून करुन घेतले जाईल व होणारा खर्च हा मक्तेदारांच्या देयकांमधून कमी केला जाईल.

९) दर मान्य झाल्यास नंतर कोणत्याही प्रकारची वाढ देण्यात येणार नाही. तसेच संबंधित मक्तेदाराचे देयक तिमाही- सहामाही- वार्षिक तत्वावरच काढणेत येईल याची नोंद घ्यावी

१०) दंडात्मक कार्यवाहीचे सर्व अधिकार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.) यांना राहतील. केलेल्या कार्यवाहीचा अंतिम निर्णय पुरवठाधारकांस पाळणे बंधनकारक राहील.

११) निविदेतील अटी व शर्तीचे पालन करणे आपणास बंधनकारक आहे. निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा आपणांकडून भंग झाल्यास पुरवठाधारकांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

१२) प्रचलित नियमानुसार देयकातून आयकर वजा/कपात करण्यात येईल.

१३) निविदा प्रक्रियेमध्ये काही अडचणी/ त्रुटी आढळून आल्यास त्याबाबतचे सर्व अधिकार हे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.) यांचेकडे राखून ठेवले आहेत.

१४) पुरवठाधारकांने सदर निविदेच्या अटी व शर्ती मान्य असलेचे प्रमाणपत्र सादर करावे.

(परमेश्वर राऊत)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
जिल्हा परिषद, सोलापूर